# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- ०३/०२/२०१८

काल दिनांक ०२ फेब्रुवारी २०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो., मा. अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) डॉ. महेश्वर रेड्डी साो., मा. अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. हरी बालाजी साो. यांच्या मार्गदर्शनाखाली सी-६० चे जवान उपविभाग कुरखेडा अंतर्गत येणाऱ्या पोमके मालेवाडा हद्दीतील मौजा कुमडपार जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान राबवित असताना सकाळी ०८:४५ वा. सुमारास जंगलात दबा धरुन बसलेल्या माओवादयांनी पोलीसांवर बेछुट गोळीबार केला. स्वसंरक्षणार्थ आणि प्रत्युत्तरादाखल पोलीसांनी माओवादयांवर गोळीबार केला असता पोलीसांचा वाढता दबाव पाहून घनदाट जंगलाचा फायदा घेत माओवादयांनी घटनास्थळावरुन पळ काढला.

यानंतर घटनास्थळावर शोध अभियान राबविले असता घटनास्थळावरुन माओवादयांचे एक .३०३ रायफल, दोन १२ बोअर रायफल, ४ पिट्टू तसेच माओवादयांचे जीवनावश्यक साहित्य मोठया प्रमाणावार जप्त करण्यात आले. या घटनेनंतर सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.